नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 22/09/2020 (मंगळवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर माथनी टोल नाका, मौदा येथे दिनांक 21/09/2020 चे 01.40 वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 35/ ऐजे – 1252 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासणी केली असता ट्रक मध्ये एकुण 14 गाई व 17 बैल कि. 3,95,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) कासीम उर्फ वसीम जूम्मन शेख, वय 36 वर्ष, 2) मनिश गौरीशंकर सराटे, वय 20 वर्ष व 3) भोलेशंकर फुलीचंद सराटे, वय 40 वर्ष, तिन्ही रा. चंगेरी, ता. जि. गोंदिया यांच्या ताब्यातुन 31 जनावरे कि. 3,95,000/–रू., वाहनासह एकुण किंमती 13,95,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. मनोज लांजेवार, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 5(ब),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जंगवाड 8805027102 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर